Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

April -2021

ISSUE No- 291 (CCXCI ) D

## Women's Empowerment Issues and Challenges



**Chief Editor**

Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**

Asst. Prof. Baliram Pawar
Head, Department of Sociology
Mahatma Phule Mahavidyalaya
Kingaon Latur Maharashtra

**Editor**

Dr. Anerao Madhav Marotrao
Head, Department Of Sociology
Lokmanya Mahavidyalaya, Sonkhed
Tq. Loha Dist. Nanded.

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

ISSUE No- (CCXCI )291(D)

April -2021

## Women's Empowerment Issues and Challenges



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
Asst. Prof. Baliram Pawar
Head, Department of Sociology
Mahatma Phule Mahavidyalaya
Kingaon Latur Maharashtra

**Editor**
Dr. Anerao Madhav Marotrao
Head, Department of Sociology
Lokmanya Mahavidyalaya,
Sonkhed Tq. Loha
Dist. Nanded

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

**Aadhar Publication**

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 291 (CCXCL) D
ISSN : 2278-9308
April 2021

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Dist. Parbhani


| | | |
|---|---|---|
| 22 | विदर्भातील शेतकरी आत्महत्येचे समाजशास्त्रीय चिकित्सक अध्ययन (विदर्भातील शेतकरी आत्महत्येचे पुरूष व महिला आत्महत्येचे कारणे व उपाय) **डॉ.अनिल पी.जैन / प्रा.लक्ष्मण मारोतराव वानखेडे** | 78 |
| 23 | पंचायतराज आणि स्त्रियांची भूमिका **प्रा. डॉ. ए. बी. वानखडे** | 82 |
| 24 | महिला आणि मानवाधिकार **डॉ. अनिता ए. सार्वे** | 85 |
| 25 | ग्रामीण भागातील महिलांचे सशक्तीकरण **डॉ.मारोती धोंडीबा कच्छवे** | 89 |
| 26 | मानवी हक्क आणि महिला **कविता वा. ऊईके** | 93 |
| 27 | महिला सबलीकरण: शासकीय उपाय – योजना एक अभ्यास **डॉ. अनुजा वि. गावडे / डॉ. सीमा अ. बागुल** | 97 |
| 28 | समाज और नारी डॉ. अनुपमा | 105 |
| 29 | भारत में महिला सशक्तिकरण का मूल्यांकन **डॉ.योगेन्द्र कुमार** | 113 |
| 30 | महिला वृद्धांबाबतचे शासनाचे धोरण व विविध योजना **प्रा. (डॉ). रविंद्र वाघ / प्रा. सौ. सुवर्णा कऱ्हाड** | 117 |
| 31 | आत्महत्या : स्त्री हिंसेचे बदलते स्वरूप **मुबीन जमिरअली सय्यद** | 124 |
| 32 | महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्थेत महिला सरपंचांची भूमिका : एक संशोधनात्मक अभ्यास **प्रा. महेंद्रकुमार जाधव** | 127 |
| 33 | Women's Role In Panchayat Raj System **Dr. Kemparaju** | 132 |
| 34 | A Study On Role Of Traditional Birth Attendants Among The Hajong Community Dhemaji District,Assam **Suman Kousik** | 135 |
| 35 | Library Automation In Academic Library **Nilam Bambroo** | 139 |
| 36 | Women Empowerment Through Government Schemes For Developing Entrepreneurial Skills **Prof. Sampada S. Lavekar** | 144 |
| 37 | Female Literacy Are Role In Tourism –A Case Study Of Nashik **Prof. Ahire Vijay Deoman** | 148 |
| 38 | Role of Women Empowerment In Indian Economy **Dr. Mithila B .Wakhare** | 153 |
| 39 | With Wings, Not To Fly But To Shelter: Analysing Women Around The Disabled In Select Malayalam Narratives **Sayoojya C. S.** | 159 |
| 40 | Right To Education & Women Status **Dr. Rani Sarode** | 164 |
| 41 | Domestic Violence In The Era Of Gender Justice In India **Dr. Sushma Sharma** | 167 |
| 42 | Planning Library Automation In Academic Libraries **Dr. Namdev Kishanrao Rathod** | 176 |
| 43 | Women Empowerment And Self -Perception: A Study With Special Reference To The Mothers Having Special Child And Normal Child **Dr. Jyotsna Srivastava** | 181 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 292 (CCXCL) D
ISSN : 2278-9308
April, 2021

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

# ग्रामीण भागातील महिलांचे सशक्तीकरण

# (Women Empowerment in Rural Area)

प्रोफेसर.डॉ.मारोती धोडींबा कच्छवे
वाणिज्य विभाग प्रमुख, व संशोधन मार्गदर्शक.कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ
जि.परभणी 431516 Email ID: mkachave@gmail.com

**प्रस्तावना(Introducatio):**

भारताचा सर्वांगीण विकास हा ग्रामीण भागावर अवलंबून आहे. जोपर्यंत ग्रामीण भागाचा विकास होणार नाही तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही. भारतातील जास्तीत जास्त लोकसंख्या ग्रामीण भागात राहते त्यामध्ये 50% लोकसंख्या ही महिलांची आहे. शेतीतील बरीच कामे ही महिला मार्फत केली जातात त्यामुळे ग्रामीण विकासासाठी महिला सबलीकरणाची गरज आहे. भारतीय संस्कृती पुरुषप्रधान म्हणून ओळखली जाते. पुरुष वर्गाने महिलांना कमी लेखून त्यांचे क्षेत्र चूल आणि मूल एवढेच मर्यादित केले. त्यांना सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात विकास करण्याकरिता वाव दिला नाही. ग्रामीण भागात अजूनही स्वतः निर्णय घेऊ शकत नाहीत. इथे त्या पुरुषांच्या निर्णयावर अवलंबून राहतात. त्यांची निर्णय क्षमता वाढणे गरजेचे आहे. घटनेने अनेक अधिकार दिलेले आहेत याची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचली पाहिजे प्रबोधन झाले पाहिजे.

भारतातील बहुसंख्य स्त्रिया घर कामात गुंतलेल्या आहेत. कमी उत्पादकतेची व कमी कौशल्याची कामे स्त्रियांकडे दिले जातात. महिलांचे आर्थिकदृष्ट्या सबलीकरण होण्याचे प्रमाण व वेग कमी आहे. या उपजीविकेसाठी शेती, मजुरी, उद्योग, दुग्ध व्यवसाय इत्यादी क्षेत्रात काम करतात परंतु त्यांच्या कामाचे कधीच मोजमाप केले जात नाही. त्यामुळे आर्थिक सबलीकरणाला चालना मिळत नाही. कुटुंब एकत्रित असो किंवा विभक्त केंद्रस्थानी पुरुषच असतो. कुटुंब प्रमुख म्हणून पुरुषच असतो. त्या कुटुंबातील महत्त्वाचे निर्णय तो पुरुषच घेत असतो. पुरुष प्रधान व्यवस्थेमुळे कुटुंबात मुलांचा जन्म झाल्यास जितका आनंद होतो तितका आनंद मुलगी झाल्यावर होईलच असे नाही. काही कुटुंबात इतर चिंतेचे वातावरण असते. 1901 साली दर हजार पुरुषांमागे 972 स्त्रिया होत्या ते प्रमाण 1991 मध्ये 927 पर्यंत घसरले होते. 2011 मध्ये स्त्रियांचे प्रमाणे प्रत्येक हजार पुरुषांमागे स्त्रिया चे प्रमाण 940 इतके पोहोचले होते. आज स्त्रियांचे घटते प्रमाण ही देशापुढची एक महत्त्वाची समस्या बनली आहे.

महिला प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवीत आहेत. ग्रामीण भागात महिला सक्षमीकरणाकडे अग्रेसर होत आहेत. शेती, शिक्षण, वैद्यकीय, बचत गट, राजकारण अशा अनेक क्षेत्रात महिलाची वाटचाल त्याची साथ देत आहेत. ग्रामीण भागात शिलाई मशीन चालविणे, कापड, किराणा दुकान चालवणे, पापड निर्मिती करणे, पिठाची गिरणी चालवणे इत्यादी कामातून ग्रामीण भागातील महिला व्यवसायातही ठसा उमटवीत आहेत. महत्वाच्या पदावर महिला जात आहेत. ग्रामपंचायत सदस्या, सरपंच, पंचायत समिती सदस्या, सभापती, जिल्हा परिषद सदस्या, अध्यक्षा, शालेय समिती अध्यक्षा, नगराध्यक्षा, महापौर, आमदार, खासदार, विधानसभा किंवा लोकसभा अध्यक्षा, मुख्यमंत्री, मंत्री, प्रधानमंत्री, राष्ट्रपती अशी विविध पदावर महिला विराजमान आहेत. या माध्यमातून महिलांचे प्रश्न मांडत आहेत. 1990 मध्ये ते 33% स्थानिक स्वराज्य संस्थात प्रथम स्त्रियांना 30% राखीव जागा मिळाल्या. 1993 मध्ये 33% आणि 2009 मध्ये 50% राखीव जागा मिळाल्या. स्थानिक प्रशासनात सहभाग वाढविण्यासाठी उत्तम

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 292 (CCXCL) D
ISSN : 2278-9308 April, 2021

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

संधी मिळाली आहे. 1994 मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले. त्यात कालसुसंगत बदल करून 2001 मध्ये दुसरे आणि 2014 मध्ये तिसरे महिला धोरण निश्चित केले गेले.

संशोधनाचे उद्देश:

संशोधनाची खालील प्रमाणे उदेश निश्चित करण्यात आलेले आहेत.

01. महिला सक्षमीकरणासाठी प्रस्तावना पाहणे.

02. महिला सक्षमीकरणाची उद्दिष्टे स्पष्ट करणे.

03. महिला सबलीकरणासाठी शासनाचे प्रयत्न पाहणे.

04. ग्रामीण महिला सबलीकरणासाठी उपाययोजना शोधणे.

05. निष्कर्ष काढणे.

संशोधनाचे गृहितके:

सदर संशोधनाची खालील प्रमाणे ग्रहीतके निश्चित करण्यात आलेले आहेत.

01. महिला प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवीत आहेत.

02. स्त्री-पुरूष हे देशाच्या विकासरथाची दोन चाके आहेत. परंतु अनेक शतकापासून समाजाने स्त्रीला परंमपरेच्या बंधनात अडकून ठेवले आहे.

अभ्यास पद्धती:

सदर शोध निबंधसाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर केला असून त्यात संदर्भ ग्रंथ, मासिके, दैनिक वर्तमानपत्रातील लेख, इंटरनेट इत्यादींचा वापर करून निश्चित उदेशानुसार शोधनिबंध तयार करण्यात आलेला आहे.

महिला सक्षमीकरण:

जगातील प्रत्येक देशात समाज आणि राष्ट्राच्या विकासातील एक महत्त्वाचा घटक म्हणजे महिला होय. महिला आजही उपेक्षित जीवन जगत आहेत. महिला सक्षमीकरण ही स्त्री अधिकाराचा पुरस्कार करणारी तसेच स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने विकासाच्या आणि प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून देणारी प्रक्रिया आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेने 1975 हे राष्ट्र आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केले होते. महिला सशक्तीकरण याचा मूळ हेतू महिलांच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक जीवनात गुणवत्ता सुधारून त्यांच्यावरील अन्याय व अत्याचार दूर करणे, त्यांचे खच्चीकरण थांबवून त्यांना मानसिक आणि बौद्धिक विकास घडवून आणणे हा आहे. महिलांना पुरुषांबरोबर समान संधी दर्जा आणि प्रतिष्ठा मिळवून देणारी चळवळ आहे. महिला सक्षमीकरण म्हणजे महिलेने स्वतःच्या क्षमतांची ओळख करून क्षमतांचा विकास करावयाच्या घरगुती व सामाजिक निर्णयाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचा प्रयत्न करणे होय.

महिलांना विकास प्रक्रियेत सहभागी करून घेतल्याशिवाय देशाचा विकास होऊ शकत नाही. परंतु महिलेने कसं रहावं, कसं दिसावं, कसं बोलावं, हे प्रत्येक समाजाच्या पारंपारिक पद्धतीत रूढ झाले आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत महिलांना दुय्यम स्थान दिले आहे. पुरुषांनी तिला घरगुती, सहचारिणी, उपभोग्य वस्तू बनवून टाकले आहे. महिलांवर अनेक प्रकारची बंधने लागल्यामुळे ती अबला बनली. त्यामुळे महिला सबलीकरणाशिवाय उज्वल भविष्य असू शकत नाही. यासाठी महिला सबलीकरण आवश्यक आहे.

महिला सबलीकरण उद्दिष्टे:

महिला सबलीकरणाची खालील प्रमाणे उद्दिष्टे सांगता येतील.

01. महिलांना आर्थिक, सामाजिक आणि राजकीय न्याय मिळवून देणे.

02. महिलांवरील अन्याय अत्याचार दूर करणे.

03. स्त्री-पुरुष समानतेवर आधारित व्यवस्थेची निर्मिती करणे.

04. महिलांना रोजगाराभिमुख बनविणे.

05. महिलांचा मानसिक व बौद्धिक विकास साधणे.

06. महिलांचे खच्चीकरण थांबविणे.

07. महिलांचा राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढविणे.

देशाचा विकास घडवून आणायचा असेल तर महिलांचे ग्रामीण भागातून राजकीय सशक्तीकरण झाले पाहिजे. महिला आरक्षणामुळे ग्रामीण भागात स्थानिक पातळीवर नवी सत्ता केंद्र निर्माण झाली. शिक्षणातून महिलेला स्वत:ची ओळख होते. स्त्री-पुरुष हे देशाचे विकासरथाची दोन चाके आहेत परंतु अनेक शतकापासून समाजाने स्त्रीला परंपरेच्या बंधनात अडकवून ठेवले आहे.

महिला सबलीकरणासाठी शासनाचे प्रयत्न:

महिला सबलीकरणासाठी केंद्र व राज्य सरकारने स्वतंत्र धोरण ठरवून याबाबत योग्य निर्णय घेतलेले आहेत. महिलांचे सबलीकरण करण्यासाठी महिला विकासाशी संबंधित प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रुपाने खालील कार्यक्रम महत्वपूर्ण आहेत.

01. भारतीय स्त्री मुक्ती दिन 03 जानेवारीला साजरा करणे.
02. हुंडापद्धती नष्ट करण्यासाठी जिल्हा दक्षता समितीची स्थापना करणे.
03. शासकीय सेवेत महिलांच्या आरक्षणाबाबत सूचना देणे.
04. पंचायत राज्य संस्थांमध्ये 50% आरक्षणाची तरतूद करणे.
05. महिलांवर होणाऱ्या अत्याचारांना आळा घालण्यासाठी महिलांसाठी समुपदेशन केंद्राची स्थापना करणे.
06. महिला मंडळाच्या महिला प्रशिक्षण केंद्रास अनुदान देणे.
07. निराधार महिलांसाठी शासकीय संस्था स्थापन करणे.
08. व्यवसायिक प्रशिक्षणासाठी मुलींना विद्यावेतन देणे.
09. निराधार, विधवा महिलांच्या मुलींच्या लग्नाकरिता अनुदान देणे.
10. महिलांसाठी बचत गटाची निर्मिती करून त्यांच्यासाठी प्रशिक्षण वर्ग, तसेच महिला लघु उद्योगातून निर्माण केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व वितरण करणे.
11. राष्ट्रीय व राज्य महिला आयोगाची स्थापना करणे.
12. विधवा किंवा निराधार महिलांना शिधा पत्रिका देणे.
13. देवदासी पुनर्वसन योजना राबवणे.
14. रॉकेल परवाना किंवा राशन दुकान परवाना मंजूर करताना महिलांना 30% संधी देणे.

ग्रामीण महिला सक्षमीकरणायासाठी उपाययोजना:

जगातील विकसित, विकसनशील आणि अविकसित देशात ग्रामीण भागातील महिलांसमोर अनेक समस्या आहेत. या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना महत्त्वाच्या आहेत.

01. मुलागा सोयीचा, आनंदयोग आणि मुलगी गैरसोयीची, तापदायक हा विचार चुकीचा असल्याचे प्रबोधन झाले पाहिजे.
02. महिलांनी सर्वच क्षेत्रातील नवनवीन आव्हाने पेलण्यासाठी त्यांना सक्षम व तत्पर बनविले पाहिजे.
03. महिलांचा विविध कार्यामधील सहभाग वाढविण्यासाठी महिलांना प्रोत्साहित करावे.
04. महिलांनी स्वत:मधील क्षमता ओळखावी.
05. पुरुषांनी विविध प्रकारचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य महिलांना द्यावे.
06. महिलांच्या संदर्भातील कोणतेही खटले चालविण्यासाठी स्वतंत्र न्याय यंत्रणेची निर्मिती करण्यात यावी.
07. उत्कृष्ट काम करणाऱ्या महिलांना दरवर्षी विशेष पुरस्काराने गौरविण्यात यावे. 08. महिलांना त्यांच्या हक्काची जाणीव निर्माण करून तळागाळातील महिलेपर्यंत शिक्षण पोहोचविणे आवश्यक आहे.
09. आर्थिक व्यवहार व संपत्तीमध्ये महिलांना अधिकार देणे गरजेचे आहे.
10. संसदेतील प्रलंबित असलेले 33% आरक्षणाचे विधेयक त्वरित मंजूर करण्यात यावे.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 292 (CCXCL) D
ISSN : 2278-9308
April, 2021

सारांश:

ग्रामीण भागातील स्त्रियांचे प्रश्न सुटलेले आहेत. असे नसून पूर्वीपेक्षा परिस्थितीतील बदल होत आहे. ताठ मानेनं जगणाऱ्या या स्त्रियाला आधार देण ही काळाची गरज आहे. कष्ट आणि वेळ दोन्ही इतक्या मोठ्या प्रमाणात खर्च होऊनही राग आणि कडवटपणाचा भाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसत नाही. शेतमजूर म्हणून दुसऱ्यांच्या शेतावर राबणारे स्त्रियांना ही पुरुषापेक्षा कमी मजुरी मिळते आणि आर्थिक शोषणालाही तोंड द्यावे लागते गरीब घरातील मुलींचे शिक्षण लवकरच थांबते. महिलांकडे दुर्लक्ष करून कोणताही देश प्रगती करू शकत नाही. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर महिलांना मानाने स्थान मिळावे म्हणून त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्रयत्न झालेले दिसून येतात.

संदर्भ ग्रंथ सूची:

01. डॉ. सुरेश मुळे: स्त्री-सक्षमीकरणाच्या योजना, दैनिक लोकसत्ता दि. 01 एप्रिल 2017.
02. डॉ. अश्विनी धोंडगे: बदलत्या शोधातील ग्रामीण स्त्री, दैनिक लोकसत्ता दि. 19 ऑगस्ट 2015.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani